**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३१०८ दि. २७ /०९ /२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन,पुणे

### पुणे शहरा मध्ये ढगफुटी सुदृष्य पाऊस पडल्याने पोलीसांनी , मिलेट्री व अग्नीशामक दल यांना पाचारण करुन त्याच्या मदतीने त्या तिन इसमाना पाण्या बाहेर काढले.

दिनांक २५/०९/२०१९ रोजी पुणे शहरा मध्ये ढगफुटी सुदृष्य पाऊस पडल्याने वानवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील भैरोबानाला या ठिकाणी नाल्याला प्रंचड पुर येवुन लोंकाची वाहने नाल्याच्याकडे असलेली झोपडी वजा घरे जमिनद्वस्त झाले अशातच रात्रौ २३/०० वा.सुमारास तिन लोक पाण्याच्या भितीने मदिरावर चढुन बसल्याने परंतु पाण्याची पातळी वाढु लागल्याने त्या लोकांनी आरडाओरडा चालु केला.सदरची बाब भैरोबानाला बिट मार्शलचे कर्मचारी पोलीस शिपाई चिव्हे व पोलीस शिपाई गायकवाड तसेच चौकी अंमलदार पोलीस हवालदार शिवजी घुले व पोलीस नाईक विनोद भोसले यानी त्यांना मंदीरावरुन बाजुला काढण्याचा प्रयत्न केला परंतु पाण्याचा प्रवाह जोरात असल्याने त्यांना बाहेर काढणे अशक्य झाले म्हणुन पोलीसांनी मिलेट्री व अग्नीशामक दल यांना पाचारण करुन त्याच्या मदतीने त्या तिन इसमाना पाण्या बाहेर काढले.